# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३**

## मृद व जलसंधारण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडएच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०२, मृद व जलसंधारण**<br>**रूपये:- ४,९०,०९,१९,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ५५२९ | १० | संपूर्ण राज्यात विशेषतः नाशिक जिल्ह्यात जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण यांचे अधिनस्त असलेल्या शाखा अभियंत्यांची १२ पदे रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे ही रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी सदर शाखा अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (२) | ५५३२ | १० | राज्यात जलसंधारण विभागाच्या दिनांक ४ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयामुळे जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे होणारे समावेशन बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे, जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे समावेशन बंद असतानाही दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुन्हा समावेशन करण्यात येत असताना यासंदर्भात समावेशन करताना जलसंपदा विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतले जाने,३० नोव्हेंबर, २०२२ रोजीचा शासन निर्णय मूळ शासन आदेशाचे उल्लंघन करीत असून संबंधित शासन निर्णय रद्द करून संबंधित प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ सेवा जलसंपदा विभागाकडे तात्काळ प्रत्यार्पित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (३) | ५६१६ | १० | जलयुक्त शिवार टप्पा दोन साठी शासनाने 5000 गावांचे लक्ष निर्धारित केलेले असते, 5000 गावांमध्ये विविध सरकारी योजनांच्या एकत्रीकरणातून योजना राबवण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असला तरी देखील 5000 गावांचे लक्ष किती दिवसांमध्ये पूर्ण करायचे तसेच जिल्हा न्याय तालुका निहाय उद्दिष्ट काय असेल एका गावासाठी नेमका किती खर्च करावयाचा आणि प्रति घनमीटर किती खर्च करावयाचा याबाबतचा निर्णय अद्याप शासनाने घेतलेला नसणे जलयुक्त शिवार मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात कृषी विभागाच्या 65 रुपये घनमीटर खर्च या निर्णयावर संपूर्ण राज्यभरातून तक्रारी आल्यानंतर आणि काही गावांमध्ये लोकसहभागातून आणि कंपन्यांच्या माध्यमातून केलेल्या कामाचा दर 28 रुपये ते 32 रुपये घनमीटर असा झालेला असणे त्यानंतर मुख्य |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सचिवांच्या समितीने घनमीटरला 27 रुपये दराच्या मर्यादेत मान्यता दिलेली असते तथापि घनमीटरला 130 रुपये एवढा कमाल दर लागू करण्यात आलेला आहे यासंदर्भात शासनाने तातडीने उद्दिष्ट निश्चिती आणि धरण शेती करून योजना राबविण्याची आवश्यकता. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (४) | ५४५४ | १० | शिरुर – हवेली (जि.पुणे) मतदारसंघातील सुमारे रुपये 5 कोटींची को.प बंधारा / सा.गे. बंधाऱ्यांची कामे जलसंधारण विभागाकडून मंजूर झालेली असताना निविदा प्रक्रिया थांबविण्यात येणे, उन्हाळयामध्ये पिण्यासाठी व शेतीसाठी पाण्याची कमतरता भासणे, सदर कामे झाल्यास पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होणे, तसेच भुगर्भातील पाणी पातळीमध्ये वाढ होणार असणे, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता निविदा रद्दच्या कार्यवाहीमधून सदरची कामे वगळून कामांचा कार्यरंभ आदेश देण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५) | ५४८५ | १० | राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात जल मिशन योजना राबविण्यात येणे, शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोई उपलब्ध होण्यासाठी जलसंधारण विभागाच्या वतीने जलसंधारणाची कामे विविध योजनेतून मंजुरी देऊन त्यास निधीसह प्रशासकीय मान्यता देणे, त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रातील १० गेटेड बंधाऱ्याचे कामे प्रस्तावित करणे, परंतू या सर्व कामासाठी पाणी उपलब्ध प्रमाणपत्र प्रमाणपत्र ची आवश्यकता असल्यामूळे स्थानिक कार्यकारी अभियंता जलसंधारण विभाग चंद्रपूर यांच्याकडून मुख्य अभियंता जलसंधारण विभाग नागपूर यांच्यामार्फतीने मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता कार्यालय नाशिक यांच्याकडे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र साठी प्रस्ताव पाठविण्यात येणे, मात्र पाणी उपलब्धता प्रमाणपत्रासाठी जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक या कार्यालयाकडून दिंनाक ३० जानेवारी २०२३ रोजी पत्र पाठवून प्रति प्रस्ताव सात लाख 70 हजार दोनशे रुपये या प्रमाणे ७० लाक्ष ७० हजार २०० रूपये भरण्याबाबतची मागणी करणे परंतु , कार्यकारी अभियंता जलसंधारण विभाग चंद्रपूर या कार्यालयाकडे पाणी उपलब्धता प्रमाणपत्रासाठी निधीची तरतूद नसल्याने सदर रक्कम भरणे अडचणीचे ठरलेले असणे, त्यामुळे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळत नसल्याने या चांगल्या योजनेचा भट्ट्या बाळ होत असल्यामुळे शेतकऱ्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी राज्य शासनाने पाणी उपलब्धता प्रमाणपत्रासाठी भरावयाची रक्कम रदद करून त्या प्रमाणाने सुधारीत परिपत्रक काढणे तसेच चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रातील १० गेटेड बंधाऱ्याची पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची रक्कम माफ करणे किंवा रद्द करणे याबाबत शासनाने तातडीने करायची कारवाई उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (६) | ५५२६ | १० | जलसंधारण विभाग चंद्रपूरने ० ते १०० हे.क्षमतेपर्यंत कोपब बंधाऱ्याचे बांधकाम व दुरूस्ती (२७०२-6766) लेखाशिर्ष मध्ये ब्रम्हपूरी तालुक्यातील बल्लारपुर माल ३ व चौगान २ येथील कोल्हापूर बंधारास चंद्रपूर जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत निधीसह मंजूरी देण्यात आलेली असणे, या दोन्ही बांधकामास मंजूरी मिळताच जलसंधारण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विभाग ब्रम्हपूरी यांनी कामास सुरूवात केलेली असणे, हे दोन्ही कामाचे बांधकाम सुरू असतांनाच जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी कोणतेही कारण न देता स्थगिती दिली असणे, त्यामुळे सध्यातरी उपरोक्त काम बंद पडलेला असल्यामुळे याचा त्रास शेतकऱ्यांना होत असल्यामुळे त्यांच्यात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी स्थगितीमूळे हे दोन्ही कामाचे बांधकाम अर्धवट असल्याने उपरोक्त बांधकाम पुर्ण होण्यासाठी दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (७) | ५४५२ | १० | महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या व सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कोल्हापुरी बंधारे, तलाव दुरूस्ती, सिमेन्ट बंधारे यासह विविध कामांना निधीसह प्रशासकीस मान्यता देणे, निधीसह प्रशासकीस मान्यता मिळालेल्या व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेल्या व निविदा प्रक्रिया सुरू असलेल्या कामांना शासनाच्या आदेशान्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ विभागाने माहे जुलै २०२२ च्या पत्रान्वये स्थगिती दिल्यामूळे सर्व सिचंनाच्या योजना ठप्प झाले असल्यामूळे शेतकऱ्यांना सिचनापासून वंचित राहावे लागत असणे, प्रशासकीय मान्यतेसह मंजुर असलेले कामे आता होणार नाहीत अशी भावना शेतकऱ्यांत निर्माण झाल्यामूळे त्यांच्यात पसलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी राज्य शासनाने गेल्या ऑगस्ट २०२२ पासून तर २ डिसेंबर २०२२ च्या दरम्यान राज्यातील अनेक जिल्हयातील जलसंधारणच्या महाराष्ट्र जलसंधारण महामंडळकडून कामावरील दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले आहे त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांना दिलेली स्थगिती उठवून ही सर्व कामे पुर्ववत सुरू करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (८) | ५३७१ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात सतत पिण्याच्या पाण्याची समस्या दरवर्षी उद्धवत असून जुन्या साठवण तलाव गाळ असल्याने तलावाची क्षमता पुर्ण न होणे, यासाठी संख, सिध्द्धनाथ, भिवरगी, दोड्डनल्ला, अंगलर्गी, कोळगिरी, सनमडी, प्रतापपूर, कोसाठी, शेगांव या तालुक्यातील गाळ काढून पुर्ण क्षमतेने तलाव उपयोगात यावा, यासाठी करावयाची कार्यवाही. |
| (९) | ५३७२ | १० | सांगली जिल्हयातील जत येथील पाझर तलाव पाण्याची साठवण न होणे, त्यामुळे दुष्काळी तालुक्याकतील नागरिकांना पिण्याचा पाण्याचा प्रश्न भेडसावत असून त्यामुळे स्थानिक जनतेत निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत राज्यशासनाने जत तालुक्याकतील पाझर तलावाचे साठवण तलावात रुपांतर करण्याची नितांत आवश्यकता . |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१०) | ५३७८ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात पाषाण गावालगत येळदरी, सिध्देश्वर मंदीर, वायफळ, हरणखोरी, आंबडी, याठिकाणी पाण्याची भीषण समस्या जाणवत असुन तेथे नवीन साठवण तलाव बांधण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची कार्यवाही |
| | | | **मागणी क्रमांक: झेडएच-३** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: २७०२, लहान पाटबंधारे** |
| | | | **रूपये:- १,९४,९९,०१,०००/-** |
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (११) | ५३८४ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर तालुका हा अवर्षण प्रणव क्षेत्र असून सातत्याने दुष्काळास सामोरे जावे लागणे, अनेक गावांमध्ये ठिकठिकाणी गॅटेड सिमेंट बंधारे मंजुर झाल्यास या गावातील नागरिकांच्या आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच सिंचनाचा पाण्याचा प्रश्न सुटण्यात मोठया प्रमाणात मदत होणार असून रावेर तालुक्यातील अंधारमळी, तिडया, मोहमांडली,निमडया, पाल क्र. १ व २ या गावांमध्ये सिमेंटबंधारे जलसंधारण महामंडळ निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१२) | ५४२९ | १० | अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात घोटा येथे सिमेंट नाला बांधकाम व भातुकली तालुक्यातील मौजे खारतळेगाव येथे नाला खोलीकरण व रुंदीकरण यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृदू व जलसंधारण विभाग, अमरावती यांनी तांत्रिक मान्यता दिली असून या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांना दि. १ नोव्हेंबर २०२२ रोजी निवेदन दिले आहे,याबाबत अउक्त कामांना प्रशासकीय मान्यता देण्यातबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ५४३० | १० | रेवसा, ता.अमरावती येथील पेढी नदीच्या पुरामुळे गावालगतची भिंत पूर्णपणे खचलेली असून रेवसा गावामध्ये पावसाळयात कधीही पुराचे पाणी येऊन शेतीतील पिकांचे मोठया प्रमाणत नुकसान होत असून याबाबत माहे ऑगस्ट,२०२२ सुमारास संबंधित विभागाकडे निवेदन दिले असणे, याप्रकरणी शासनाने पेढी नदीवरील संरक्षण भिंतीचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ५४३१ | १० | जळका हिरापूर, ता.भातकुली येथील ब्रिटीशकाली तलाव माहे १९/९/२०२२ च्या अतिवृष्टीमुळे पूर्णपणे भरल्यामुळे तलावाच्या भिंतीवरील माती वाहून गेली असल्याचे निदर्शनास आले असून याबाबतचे माहे सप्टेंबर,२०२२ दरम्यान जिल्हा जलसंधारण अधिकारी अमरावती यांना लेखी निवेदन दिले असणे, उक्त प्रकरणी संबंधित तलावातील पाणी गावात व शेतात शिरणार नाही त्याअनुषंगाने जळका हिरापूर, ता.भातकुली येथील ब्रिटीशकालीन तलावाच्या भिंतीच्या दुरुस्तीबाबत उपाययोजना करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. शेखर निकम** |
| (१५) | ५४०६ | १०० | कोकणामध्ये दरवर्षी 4000 मिलीमीटर पाऊस पडून सुध्दा एप्रिल ते मे मध्ये नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. त्यामुळे जलसंधारणाच्या छोटया-छोटया लघुपाटबंधारे योजना कोकणामध्ये प्राधान्याने होणे गरजेचे आहे. कोकणामध्ये नाल्याचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तीव्र उतार व नाल्याची कमी रुंदी, यामुळे छोटे-छोटे सिमेंट बंधारे शासनाच्या प्रचलित मापदंडामध्ये असफल ठरत असल्याने सदरची कामे हाती घेता येत नाही. सबब, बंधाऱ्यांचे कोकणामधील भौगोलिक परिस्थितीचा विचार करण्यात यावा व मापदंडामध्ये सुधारणा करण्यात यावी. शासनाच्या सर्वच विभागामध्ये कर्मचारी यांची संख्या कमी असल्याने शासनाच्या योजना कार्यान्वीत करताना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. याबाबत शासनाने धोरण ठरविण्याची आवश्कता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: झेडएच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ३१,६६,८३,९५,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१६) | ५३४६ | १० | जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई आाणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ या विभागाच्या अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या व सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कोल्हापुरी बंधारे, तलाव दुरूस्ती, सिमेन्ट बंधारे यासह विविध कामांना विविध योजनेतून निधीसह प्रशासकीस मान्यता देणे, निधीसह प्रशासकीस मान्यता मिळालेल्या व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेल्या व निविदा प्रक्रिया सुरू असलेल्या कामांना शासनाच्या आदेशान्वये जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ विभागाने माहे जुलै २०२२ च्या पत्रान्वये स्थगिती दिल्यामूळे सर्व जलसंधारणातील कामाच्या योजना ठप्प झाले असल्यामूळे शेतकऱ्यांना सिचनापासून वंचित राहावे लागत असणे, राज्य शासनाने गेल्या ऑगस्ट २०२२ पासून तर २ डिसेंबर २०२२ च्या दरम्यान राज्यातील अनेक जिल्हयातील जलसंधारणतील कामाबाबत जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ या विभागाकडून विविध योजनेतील कामावर दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले आहे त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांना दिलेली स्थगिती उठवून ही सर्व कामे पुर्ववत सुरू करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: झेडएच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४७०२, लहान पाटबंधा-यावरील खर्च**<br>**रूपये:- ८,३४,००,०२,०००/-**<br>**श्री. धिरज देशमुख** |
| (१७) | ५५९५ | १० | निवळी येथे कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे तयार करणे. सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५५९८ | १० | कोष्टगाव येथे गेटेड सिमेंट बंधारा क्र.५ दुरूस्ती करणे.सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१९) | ५६०० | १० | कोष्टगाव येथे गेटेड सिमेंट बंधारा क्र. ७ दुरूस्ती करणे. सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ५६०५ | १० | चांडेश्वर येथे कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे तयार करणे .सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५६२० | १० | तावरजा नदी येथे कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे तयार करणे गरजेचे असणे..सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ५६२१ | १० | रामवाडी येथे कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे तयार करणे गरजेचे असणे. सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ५६२२ | १० | गोढाळा येथे कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे तयार करणे गरजेचे असणे.सिंचन क्षेत्रातवाढ होण्यासाठी व पाणी क्षेत्रातवाढ होण्यासाठी आवश्यक असणे. याबाबत तातडीने निधीची तरतूद करणे आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) मृद व जलसंधारण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई